“शेतीपुरक व्यवसायाचे शेतक-यांच्या आर्थिक विकासातील योगदान: विशेष संदर्भ जालना जिल्हा"

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
मानव्य विज्ञान विद्याशाखे अंतर्गत अर्थशास्त्र विषयातील पीएच.डी. पदवीसाठी
सादर करण्यात येणा-या शोधप्रबंधाचा आराखडा

• संशोधक •

श्री. नवल समाधान ज्ञानेश्वर

एम.ए.(अर्थशास्त्र)

• मार्गदर्शक •

प्रा. डॉ. के.एस. बाभूळगावकर
प्राध्यापक व संशोधक मार्गदर्शक

अर्थशास्त्र विभाग

श्री.योगानंद स्वामी कला महाविद्यालय,
वसमत जि. हिंगोली

जुन-२०२३

प्रस्तावना:

शेती हा व्यवसाय अतिशय प्राचीन काळापासून सुरु झाला असून, मानवी जीवनातील अतिशय महत्वाचा टप्पा आहे. माणवाच्या विकासाबरोबर या व्यवसायाची सुरुवात झाली असून तो अनादी काळापर्यंत चालू आहे. आज मानवाच्या विकासाबरोबर या शेती व्यवसायातही अमुलाग्र बदल होत आहेत. जेव्हा सुरुवातीस माणव हा माकड अवस्थेत होता तेंव्हा तो झाडावरचे फळे, कंदमुळे, मांस याचे सेवन करुन आपले जिवन व्यतित करित असे पण जस जसे माणवाचा विकास होत गेला तस तसे अनेक नविन गोष्ट तो आत्मसात करीत गेला त्याचाच एक भाग म्हणजे मानवाला शेती व्यवसायाचा लागलेला शोध होय. सुमारे अकरा हजार वर्षापूर्व आदि मानवाच्या हे लक्षात आले की, झाडावरुन जमिनिवर पडणारे बियाने खाली पडल्यावर वातावरणामुळे रुजते व उगवते आणि त्यातुनच वणस्पतीची वाढ होते. तेंव्हापासून मानवाने शेती करण्यास सुरुवात केली. तो अनेक धान्याचे बिया आपल्या शेतीत लागवड करुन त्यापासुन अन्नधान्याचे उत्पादन करण्यास सुरुवात केली. यावरुन अन्नधान्य पुरवठा हा शेती पुवरक व्यवसायातुनच होतो. आणि मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती शेती व्यवसायातूनच शक्य आहे हे मानवाला लक्षात आले आणि शेती व्यवसायाचा विकास झाला.

भारतात ही अगदी प्राचीन काळापासून शेती करीत आहेत. भारतीय शेतीला एक ऐतीहासीक, सास्कृतीक, सामाजिक, अर्थिक असे महत्व प्राप्त झाले आहे. भारताच्या इतिहासात आपणाला भारतीय शेतीचे अनेक पौरानिक कथाही ऐकावयास मिळतात. तेंव्हापासुन ते आजपर्यंत भारतात शेतीला अनन्य साधारन असे महत्व आहे. शेतीला मातेसमान स्थान देवून शेती ही पवित्र मानली जाते. प्राचिन काळात गौतम बुध्दानी कृषी व्यवसायाचा मंत्र दिला होता. तर मायं काळात इ.स.पूर्व ३२१ ते ३०० मध्ये कौटिल्याचे अर्थशास्त्र ह्या आपल्या ग्रंथाची मांडणी करुन त्यात कृषी क्षेत्राचे विस्तृत असे विवेचण केले आहे. काळानुरूप भारतातील अनेक प्राचिन विचारवंतांनी शेतीचे महत्व व शेतीविषयक मत आपआपल्या परिने मांडण्याचा प्रयत्न केला आहे. त्यात म.जोतीबा फुले. म. गांधी, शाहु यासारख्या विचारवंतांनी शेतीचे महत्व पटवून देण्याचा प्रयत्न केला आहे.

भारत हा एक कृषीप्रधान देश असून भारतीय अर्थव्यवस्थेतील प्रमुख व्यवसाय म्हणुन शेतीकडे पाहीले जाते. देशाच्या ग्रामीन भागातील उपजीविकेचे एक महत्वाचे साधन म्हणून शेती व्यवसायाला अनन्यसाधारण असे महत्व आहे. भारताच्या एकूण भौगोलिक क्षेत्रापैकि (३२.९ कोटि हेक्टर) ९२.७ म्हणजेच ३०.५ कोटी हेक्टर जमिनिचे मापण करण्यात आले आहे. यापैकि प्रत्यक्ष लागवडीखाली असलेले क्षेत्रफळ १४.२ कोटी हेक्टर इतके आहे. देशाच्या एकूण उपलब्ध जमिनिपैकि ४६.४% जमिनितून विविध प्रकारची पिके घेतली जातात. शेती व्यवसायाचे भारतीय अर्थव्यवस्थेतील महत्व विचारत घेतले असता रोजगार निर्मितीचे महत्वाचे क्षेत्र म्हणूनही या क्षेत्राकडे पाहिले जाते.

सन १९५०-५१ मध्ये एकूण १४ कोटी कर्त्या लोसंख्येमध्ये शेतीक्षेत्रात गुंतलेल्या लोकसंख्येचे प्रमाण ९.८ कोटी म्हणजे ७० % इतके होते. सन २००६-०७ मध्ये शेतीक्षेत्राचे देशाच्या एकुण कर्त्या लोकसंख्येपेकि ७०.४ % लोकांना रोजगार पुरविला होता. आज २०२२ मध्ये सुध्दा एकूण कर्त्या लोकसंख्येपैकि ६०% पेक्षा जास्त लोक या शेती व्यवसायात गुंतलेले आपनाला दिसून येते.

आज नियोजन काळात राष्ट्रिय उत्पन्नात शेतीचा हिस्सा जरी कमी झालेला असला तरीही सध्या इतर विकसित देशांशी तुलना करता महत्वपूर्ण आहे. सन १९५१ मध्ये देशाच्या राष्ट्रिय उत्पन्नात शेती क्षेत्राचा हिस्सा ५५.४% इतका होता तर २०१२-१३ मध्ये तो घटून १४.१ % ऐवढा झाल्याचे आपनाला दिसून येते. तथापी ईलर अमेरिका या देशांच्या राष्ट्रीय

उत्पन्नात शेतीचा हस्सा २ ते ३ % इतका आहे. तर फ्रांन्स मध्ये तो ७% इतका आहे. विकसित देशांशी तुलना करता भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नात आजही शेती क्षेत्राचे प्राबल्य आहे असे आपणास म्हणता येईल.

शेती हा व्यवसाय केवळ देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नातीलच महत्वपूर्ण व्यवसाय नसून हा व्यवसाय उद्योग, अंतरराष्ट्रिय व्यापार या दृष्टिही महत्वपूर्ण आहे. देशातील उद्योगांसाठी कच्या माल पुरविनारे महत्वाचे क्षेत्र म्हणुन शेतीकडे पाहीले जाते. भारतातील कापड उद्योग, साखर उद्योग, पिठाच्या गिरण्या, डेअरी उद्योग इत्यादी अनेक उद्योग हे शेती व्यवसायावरच अवलंबून आहेत. देशाच्या आंतरराष्ट्रीय व्यापारात सुध्दा शेती क्षेत्र महत्त्वपूर्ण भूमिका निभावत आहे. सध्या अंतरराष्ट्रीय व्यापारात परकिय चलन मिळविन्यासाठी शेतीक्षेत्राचा हिस्या १४.७ % इतका आहे. याशिवाय शेतीतील कच्चा मालाचा वापर करुन तयार केल्या जानाऱ्या विविध वस्तुंचा निर्यातीतील हिस्सा २०% इतका आहे. म्हणजे देशाच्या एकून निर्यातीत शेतमाल वस्तुंचा हिस्सा ३८% इतका आहे.

भारतीय शेती ही मोसमी पावसावर अवलंबून असल्यामुळे या क्षेत्राचा पाहीजे त्या प्रमाणात विकास होऊ शकला नाही हे आपण नाकारु शकत नाही. देशात उपलब्ध असलेल्या शेतजमिनीचा शेती उत्पादनासाठी महत्तम वापर करण्यामध्ये भारताचा रशिया, अमेरिका यांच्या पाठोपाठ तिसरा क्रमांक लागतो. देशात लागवडखालिल क्षेत्राचे प्रमाण जास्त असूनही प्रत्यक्षात कसलेले क्षेत्र कमी असल्यामुळे भारतीय शेतीची उपलब्धता न्युनतम पातळीवर राहीली आहे. जगातील अमेरिका, रशिया, फ्रान्स, चीन, जपान, जर्मनी व आस्ट्रेलीया या देशांशी तुलना करता विविध पिकांच्या बाबतीत भारतीय शेतीची उत्पादकता खुपच कमी असल्याचे चित्र आढळते.

भारतीय शेती व्यवसायाची उत्पादकता प्रगत राष्ट्रांच्या तुलनेने अत्यंत कमी आहे. या "अल्प उत्पादकतेची कारणे अनेक आहेत जसे, सामाजिक वातावरण, लोकसंख्येचा अतिरिक्त

भार, जमिनीची धुप, शेतकऱ्यांचे अज्ञान व निरक्षरता, व्यावसायिक दृष्टिकोणाचा अभाव. जमिनधारणा पध्दती. पतपुरवठा व शेतमाल विपणनाच्या सुविधांचा अभाव, विनकिफायतशर धारणाक्षेत्र, जलसिंचनाच्या अपुऱ्या सोयी, परंपरागत उत्पादन पध्दती, भांडवलाचा अभाव, शेती क्षेत्राकडे दुर्लक्ष अशा विविध कारणांमुळे भारताच्या शेती व्यवसायाची उत्पादकता वाढु शकली नाही.

भारतीय शेती क्षेत्राचा विचार करित असताना शेतकऱ्यांचाही विचार करणे तेवढेच महत्वाचे आहे. कारण शेती आणि शेतकरी यांचा अतिशय घनिष्ठ संबंध असून त्यांना एकमेकापासुन दुर करणे अशक्य आहे. भारतीय शेतकरी हा आपला शेती हा व्यवसाय व्यावसायीक दृष्टिकोणातून न करता कर्तव्यातून करतो. भारतातील शेतक-यांचा मुख्य व्यवसाय हा शेती असल्यामुळे त्यांच्या उपभोगाचे संपूर्ण दायीत्व हे शेतीवरच आहे. भारतातील शेती ही अनेकदा नैसर्गीक आपत्तीमुळे नुकसान होत असते यात ओला व कोरडा दुष्काळ तसेच चक्रीवादळ यासारखे तर बाजारपेठेचा विचार करता शेतकऱ्यांना त्यांच्या मालाला हमी भाव मिळत नाही त्यामुळे शेतकरी हा कर्जातच जन्मुन कर्जातच त्याचा मृत्यू होतो हे आपनाला अनेक उदाहरणानी पाहीलेच आहे. शेतकऱ्यांना जर त्यांना त्यांचा अर्थिक विकास साध्य करायचा असेल तर केवळ शेतीवरच अवलंबून न राहता शेतीबरोबरच इतर शेतीपुरक व्यवसायही करणे आवश्यक आहे. महात्मा गांधी यांनी आपल्या दुरदृष्टिनी शेतीपुरक व्यवसाय केला पाहीजे असे त्यांचे मत होते.

भारतीय शेती हा भारतातील लोकांचा प्रमुख व्यवसाय असूनही आज या व्यवसायात शेतकऱ्यांनाही वर्षभर काम करण्यासाठी मिळत नाही तेंव्हा हे शेतकरी वर्षातील काही महिने रिकामच राहतात तेंव्हा या शेतकऱ्यांना आपल्या अर्थिक परिस्थितीमध्ये सुधारणा करण्यासाठी व तसेच आपले दारिद्र्य व बेरोजगारी यापासून मुक्ति मिळवण्यासाठी शेतीबरोबरच इतर पुरक व्यवसाय करणे आवश्यक आहे. आज जालना जिल्हात, महाराष्ट्रात व भारताततही असे काही शेतकरी आहेत की ते आपली शेती करण्याबरोबरच शेतीपुरक व्यवसाय करीत आहेत ज्यामुळे त्यांना त्याचा फायदा होत असल्याचे दिसून येते. हे शेतकरी आपल्या शेती बरोबरच दुग्ध व्यवसाय, कुक्कुट (कोंबडी) पालन, मेंढी व शेळी पालन, मत्स पालन, फुल शेती, फळ शेती, भाजीपाला शेती, वन शेती व इतर अनेक व्यवसाय करीत आहेत. या व्यवसायांचा थोडक्यात आढावा आपण पुढिल प्रमाणे पाहू.

१) **दग्ध व्यवसाय:-** एकात्मीक शेती पध्दतीत पशुधनाचे महत्व अनन्यसाधारन आहे, म्हणूनच दूध व्यवसायासारख्या नगदी पैसे मिळवून देणाऱ्या पूरक व्यवसायाचा अंतर्भाव करणे अत्यंत आवश्यक आहे. प्राप्त परिस्थितीनुसार गोपालन,

म्हैसपालन इत्यादी करणे हितावह ठरु शकते व पीक उत्पादनातून मिळणारा चारा तसेच ज्वारी, बाजरीपासून मिळणारा कडबा चारा म्हणून उपयोगात येईल व उत्पादन खर्च कमी करता येईल तसेच जनावारांपासून मिळणारे शेण,

मलमुत्र यांचा शेतीमध्ये शेणखत, गांडूळखत व व्हीयांश संद्रिय खत म्हणून वापर करता येईल. आज आपल्या देशाने दुग्धव्यवसायात । धवलक्रांती घडवून दुग्धव्यवसायात प्रथम क्रमांक आहे, दरडोई आहारातील दुधाची उपलब्धता वाढवायची असेल आनली आहे, जगात देशाचा तर एकाचा अंतर्भाव करणे फायद्याचे ठरते. वास्तविक दुग्ध व्यवसाय आज अतिशय विशाल असे स्वरुप धारण केले आहे. आज हा व्यवसायात आत्याधुनिक तंत्रज्ञान आले असून आनेक सॉफ्टवेअर कंपन्या याकडे आकर्षित झालेल्या आहेत. तरुणवर्गातील एक मोठा गट असा आहे की, जो आता नवीन तंत्रज्ञानाचा वापर करुन शेतीव्यवसायात उतरण्याचे धाडस करत आहे.

२) कुक्कुट (कोंबडी) पालन:- हा व्यवसाय ही शेतीपुरक महत्वाचा व्यवसाय आहे. कुक्कटपालन हे अंडी उत्पादनासाठी किवा मांसासाठी (पाल) करता येते. कमी वेळेत, कमी जागेत, कमी पाण्यात व कमी मनुष्यबळात जास्त फायदा मिळवून देणारा व्यवसाय म्हणजे कुक्कुटपालन होय. एकात्मिक शेती पध्दतीत अंतर्भाव करण्यात आलेल्या विविध शेतीपूरक व्यवसायांपैकी कुक्कुटपालन हा एक फायदेशीर जोडधंदा आहे. शेतकरी गावठी कोंबड्या, व्हाईट हा न्होड आयलँड रेड या जातीच्या कोंबड्या अंडी उत्पादन करण्यासाठी पालन करतात. तर मांसासाठी ब्रॉयलर कोंबड्या पालन करीत असतात.

३) शेळी व मेंढीपालन :- कुठल्याही वनस्पतीवर सहज गुजराण करुन तग धरु शकणारे प्राणी म्हणजे शेळी व मेंढी होय. अलीकडे शेळी व मेंढीच्या मांसाची मागणी फारच वाढली असून शेळी व मेंढीपालनाचा व्यवसाय किफायतशीर होऊ पाहत आहे. कारण दुध, मांस, लोकर, कातडी व खत अशी विविध उत्पादने आपल्याला त्यापासून मिळतात. तसेच महाराष्ट्रासारख्या राज्याचा जवळपास ८४ टक्के भाग हा पावसावर (जिरायत) अवलंबून असल्यामुळे अशा अवर्षणप्रवण परिस्थितीत शेळ्या, मेंढ्या अशा हवामानात तग धरुन राहतात व जास्तीतजास्त उत्पादन देतात. तसेच खाद्याचा विचार केल्यास ती थोड्या खर्चात भरपूर उत्पादन देवू शकते. महाराष्ट्राचा जर आपण विचार केला तर धनगर समाज हा मोठ्या प्रमाणात शेळी व मेंढी पालन हा व्यवसाय शेतीला जोडधंदा म्हणुन करीत असल्याचे आपनाला दिसून येते.

४) मत्सव्यवसाय:- उपलब्ध पाण्याचा दुहेरी वापर करण्याच्या दृष्टिने विचार केल्यास शेततळी तयार करुन त्यात मत्सपालन करता येते व उपलब्ध पाण्याची उत्पादकता वाढवता येते. गोडया पाण्यातील मत्सपालनासाठी रोहू, कटला व मृगळ हे प्रमुख भारतीय कार्य मासे एकत्रितपणे संगोपण करुन वाढविता येऊ शकतात. तसेच शेततळ्यातील पाणी इतर पिकांना संरक्षित पाणी म्हणून वापरता येते. काही ठिकाणी तर उत्पादन खर्च कमी करण्याच्या दृष्टिने शेततळ्यावर कक्कुटपालन केले जाते व कोंबड्यांची विष्ठा ही माश्यांना खाद्य म्हणून तळ्यात पडेल अशी रचना केली जाते. कटला, रोहू, मृगळ, सायप्रिनस, ग्रास कार्य, सिल्हर कार्य इत्यादी माशांच्या खाण्याच्या सवयी वेगवेगळ्या असल्याने त्यांची मिश्र मत्सशेतीत उपयुक्तता सिद्ध झालेली आहे.

(५) **फुलशेती.** आज जालना जिल्हातच नव्हे तर संपूर्ण भारतात फुल शेती मोठ्या प्रमाणात करीत असल्याचे आपनाला दिसून येते. शेतकरी हा आपल्या पारंपारिक शेतीबरोबरच हंगामाव्यक्तरिक्त आपला व्यवहार चालवन्यासाठी फुलशेती करीत असतात ज्यामुळे शेतकयांना दैनदिन गरजा पूर्ण होण्यास मदत होऊन त्यांच्या उत्पन्नात वाढ होत आहे. ज्यामुळे आज या शेतीकडे वळणान्या शेतकन्यांच्या अर्थिक उन्नतीमध्ये वाढ होण्यास मदत होत आहे

६) **फळ शेती:-** फुल शेतीप्रमाणेच आज शेतकरी फळ शेतीकडे वळल्याचे आपनाला दिसून येते. या शेतीमध्ये शेतकरी उपलब्ध नैसर्गिक संसाधनांचा उपयोग करण्यासाठी योग्य ती डा द्राक्षे, पेरु, सीताफळ, बोर, अंजीर, आंबा, चिकू, संत्रा, मोसंबी, लिंबू, इ. फळपिके निवडण्यास बाब असतो. जालना जिल्हातील काही भागात यातील काही फळबागांची लागवड शेतकरी करीत असल्याचे दिसून येते.

७) **भाजीपाला शेती:-** आज लोकसंख्येच्या वाढीबरोबर लोकांना आहारासाठी लागणा-या अन्नधान्य, भाजीपाल्याची मोठ्या प्रमाणात गरज भासत असून यामुळे भाजीपाल्याची मोठ्या प्रमाणात मागणी वाढत आहे. आज काही शेतकरी आपल्या शेतीत मोठ्या प्रमाणात भाजीपाल्याची लागवड करीत असून यामुळे त्यांच्या अर्थिक उत्पन्नात वाढ होत आहे. भाजीपाला शेतीअंतर्गत शेतकरी बागा, तमाटा, कोबी, हिरवी मिरची, आवरा, मटकी, चवळी, मेती कोथंबिर, पालक, शेवगा अशा पिकांची लागवड करीत असल्याचे आपनाला दिसून येते.

८) **वन शेती:-** भारतातील अनेक भागात वन शेतीचे महत्व अनन्य साधारन असे आहे. आज वन शेतीसाठी शासनाकडून सुध्दा अनेक सोयी व सुविधा उपलब्ध असल्याचे आपनाला दिसून येते. वन शेतीच्या माध्यमातून शेतकरी उत्पन्न मिळवत आहेत. परंतू जालना जिल्हाचा विचार करता जालना जिल्हा वन शेतीचे प्रमाण नसल्याचेच दिसून येते.

अशा प्रकारे शेतकरी हा आपल्या शेतीत पारंपारिक शेती बरोबरच शेतीपुरक अशा व्यवसायांची निवड करुन आपल्या अर्थिक उन्नतीमध्ये सुधारणा करण्याचा प्रयत्न करीत आहेत. तेव्हा जालना जिल्हातील काही शेतकरी अशा व्यवसायाकडे वळले असून यामुळे त्यांचा अर्थिक प्रगतीमध्ये कशी सुधारना झाली याचा आढावा प्रस्तुत संशोधनाच्या माध्यमातून घेण्यात येणार आहे.

संशोधनाची गरज:- भारत हा कृषी प्रधान देश असून भारतातील ७० टक्के जनता ही शेतीवरच अवलंबून आहे. भारतीय शेतकरी हा अशिक्षित असून त्यांची शेती करण्याची पध्दती हो परंपरागत आहे. त्यामुळे त्यांच्या शेतीची उत्पादकता ही कमी असल्याचे आपनाला दिसून येते. भारतीय शेतकरी हा परंपरेने शेती करीत असून तो व्यावसायीक दृष्टिने आजही शेतीकडे पाहत नाही. त्यामुळे शेतक-यांचे उत्पन्न कमी असून त्यांची अर्थिक परिस्थिती बेताची असल्याची आपनाला दिसून

येते. जी परिस्थितो भारतात, महाराष्ट्रात आहे तीच परिस्थिती जालना जिल्हातही असल्याचे दिसून येते. परंतु आज काही शेतकरी शेतीबरोबरच शेतीपुरक व्यवसायाकडे वळत आहेत ज्यामुळे त्यांच्या अर्थिक उन्नतीमध्ये वाढ होताना दिसून येत आहे तेव्हा अशा शेतीपुरक व्यवसायामुळे शेतकऱ्यांच्या अर्थिक अन्नतीमध्ये वाढ होत आहे का? शेतीपुरक व्यवसायाचे कसे महत्व आहे. आहे हे इतर शेतकऱ्यांच्या समोर आनुन त्यांना शेतीपुरक व्यवसायाकडे कसे वळवता येईल याचा प्रयत्न या संशोधनाच्या माध्यमातून येथे करण्यात येणार आहे.

संशोधनाचे महत्व:-

शेती हे भारतीय अर्थव्यवस्थेतील एक महत्वाचे क्षेत्र आहे. देशातील सुमारे ५९ टक्के लोकसंख्या शेतीक्षेत्रावर प्रत्यक्षपणे अवलंबून आहे. भारतीय अर्थव्यवस्थेत शेती व्यवसायाचे महत्व अन्नधान्य पुरवठा, उद्योगधंद्यांना लागणारा कच्चा माल व आंतरराष्ट्रिय व्यापाराच्या दृष्टिने अनन्यसाधारण असे आहे. भारतात सर्वात जास्त रोजगार उपलब्ध करुन देणारा व्यवसाय म्हणजे शेती होय परंतु भारतातील शेती ही मोसमी पावसावर अवलंबुन असल्यामुळे कधी जास्त पावसामुळे शेतीचे नुकसान होते तर कधी कमी कमी पावसामुळे शेतीचे नुकसान होत असते त्यामुळे शेतकरी हा अर्थिक संकटात सापडतो व त्याच्या दैनदिन गरजाही पुर्ण तो करु शकत नाही शेती या व्यवसायावर जास्त लोक अवलंबुन असल्यामुळे त्याही लोकांना या दुष्काळाची झळ नेहमी पोहचत असल्याचे आपनाला दिसून येते. शेतकरी हा केवळ शेतीवरच अवलंबुन न राहता इतरही शेतीपुरक व्यवसाय केला पाहीजे ज्यामुळे त्यांना अशा संकटाचा सापना करणे कठीन जानार नाही, आज शेतकरी अशा शेतीपुरक व्यवसायाकडे वळत आहे त्याचा फायदाही त्या लोकांना होत आहे. तेंव्हा या शेतीपुरक व्यवसायामुळे शेतक-यांच्या अर्थिक उन्नतीमध्ये कशा पध्दतीने सुधारना होत आहे हे शोधन्याचा प्रयत्न या संशोधनाच्या माध्यमातून करण्यात येणार आहे. शेतीपुरक व्यवसाय शेतकऱ्यांना कशा पध्दतीने फायदेशीर ठरते व त्यामुळे त्यांची अधिक प्रगती कशा प्रकारे होवू शकते हे या संशोधनाच्या माध्यमातुन मांडण्यात येणार आहे.

उद्दिष्ट्ये :- प्रस्तुत संशोधनाचे उद्दिष्ट्ये पुढिल प्रमाणे स्पष्ट करण्यात आले आहेत.

१) जालना जिल्हातील शेतक-यांच्या अर्थिक स्थितीचा अभ्यास करने.
२) जालना जिल्हातील शेतीपुरक व्यवसायाच्या स्थितीचा अभ्यास करने.
३) शेतीपुरक व्यवसायामुळे शेतक-यांच्या आर्थिक स्थितीतील बदलाचा अभ्यास करने,
४) शेतीपुरक व्यवसाय करतांना येणा-या अडचनींचा अभ्यास करने.
५) शेतीपुरक व्यवसायास शासन करित असलेल्या विविध योजनांचा मदतीचा अभ्यास करने.

गृहीते :-

1. सततच्या नैसर्गीक आपत्तीमुळे जालना जिल्हातील शेतक-यांची आर्थिक परिस्थिती खालावत आहे.
2. जालना जिल्हा शेतीपुरक व्यवसायाचे प्रमाण कमी आहे.
3. शेतीपुरक व्यवसयमुळे शेतक-यांच्या आर्थिक परिस्थितीमध्ये सुधारना होते.
4. शेतीपुरक व्यवसायासाठी शासन करित असलेल्या मदतीचा सर्व शेतक-यांना लाभ मिळत नाही.

संशोधन पध्दती:-

संशोधन साहित्याचा आढावा :- प्रस्तुत संशोधनासाठी प्राथमिक व दुय्यम सामग्रीचा आधार घेण्यात येणार आहे. प्राथमिक साधनांमध्ये प्रत्यक्ष शेतीपूरक व्यवसाय करणाऱ्या शेतकऱ्यांकडे जाऊन अनुसुयोच्या साह्याने माती संकलित करण्यात येणार आहे. शेतकऱ्यांना या शेतीपूरक व्यवसायामुळे कशा पध्दतीने साम झाला व या व्यवसायामुळे त्यांची अर्थिक परिस्थिती कशी सुधारली आहे हे या संशोधात या प्रश्नावलीच्या साह्याने माहीती मिळवन्यात येणार आहे.

दुय्यम माहीती व अधिक सर्वेक्षणे, भारतीय पृथ्वी विभागाने प्रसिद्ध केलेले अहवाल, पंचवार्षिक योजनांची अंदाजपत्रके, महाराष्ट्र राज्य कृषी विभागाचे अहवाल यासारख्या शासकीय प्रकाशनामधुन गोळा करण्यात येणार आहे. तसेच नांदेड जिल्हातील कृषी व कृषीपूरक व्यवसायाशी संबंधित माहीती व आकडेवारीचा उपयोग या संशोधनासाठी करण्यात येईल तसेच इतरही आवश्यक पुस्तकांचाही वापर या संशोधनासाठी करण्यात येणार आहे.

नमुना निवड:- प्रस्तुत संशोधनामध्ये शेतक-यांच्या अर्थिक उन्नतीमध्ये शेतीपुरक व्यवसायाचे योगदान याचा अभ्यास करीत असताना सहेतुक पध्दतीने महाराष्ट्रातील जालना जिल्हाचीच या सर्व्हेक्षणासाठी निवड करण्यात आली आहे. जालना जिल्हातील एकुन ८ तालुक्यांपैकी सर्व तालुक्यांची निवड करण्यात येईल या प्रत्येक तालुक्यातुन ३० शेतक-यांची याप्रमाने एकुण २४० शेतक-यांची प्रश्नावलीच्या साह्याने माहीती संकलित करण्यात येईल.

अभ्यासाचा कालावधी:- शेतक-यांच्या अर्थिक उन्नतीमध्ये शेतीपुरक व्यवसायाचे योगदान- विशेष संदर्भ जालना जिल्हा, या विषयाचा अभ्यास करण्यासाठी सन २०११-१२ ते २०२१-२२ या दहा वर्षांच्या कालावधिची निवड करण्यात आली आहे. या कालावधित जालना जिल्हातील कीती शेतकरी शेतीपुरक व्यवसायाकडे वळले आहेत व या व्यवसायामुळे त्यांच्या अर्थिक उन्नतीमध्ये कशी प्रगती झाली याचा शोध या संशोधनाच्या माध्यमातून घेण्यात येणार आहे.

संशोधनाची मर्यादा:- प्रस्तुत संशोधनामध्ये शेतक-यांच्या अर्थिक उन्नतीमध्ये शेतीपुरक व्यवसायाचे योगदान याचा अभ्यास करीत असताना विशेष म्हणजे जालना जिल्हाचा संदर्भ घेऊन

अभ्यास करण्यात येणार आहे. प्रथम जालना जिल्हातील शेती व हवामान याचा अभ्यास करण्यात येणार आहे तर नंतर तेथील शेती करण्याची पध्दती, शेतकरी शेतीसोबत इतर कोणता व्यवसाय करतात म्हणजेच शेतीपुरक व्यवसाय कोणता करतात याची माहीती या संशोधनात घेतली जानार आहे. शेतीपुरक व्यवसायामुळे शेतक-यांच्या अर्थिक उन्नतीमध्ये कसा बदल घडतो याचा अभ्यास प्रस्तुत संशोधनात घेण्यात येईल. सदर संशोधनाद्वारे काढण्यात येणार निष्कर्ष केवळ जालना जिल्हाच्या संदर्भात आहेत. त्यामुळे याचा सर्व उपयोग इतर जिल्हांना होईलच असे म्हणता येणार नाही म्हणुन ही या संशोधनाची मर्यादा आहे.

आकडेवारीचे विश्लेषन:- आकडेवारीचे विश्लेषन करण्यासाठी सांख्यकिय साधनांचा वापर करण्यात येणार असून त्यात सरासरी, वृध्दिदर, सरासरी वृध्दिदर, सहसंबंध या सांख्यकीय साधनांचा वापर करण्यात येणार आहे.

प्रकरणांची मांडणी:- प्रस्तुत शोध प्रबंध खालिल प्रमाणे सहा प्रकरणात विभागला आहे.

प्रकरण १ ले प्रस्तावना

भारतीय शेती, हवामान व भारतातील महाराष्ट्रातील जालना जिल्हातील शेतीपुरक व्यवसाय शासनाने शेतीपुरक व्यवसायाच्या प्रोत्साहनासाठी वेळोवेळी दिलेल्या सुविधा योजना या अभ्यासाबरोबरच संशोधनाचे महत्व, उद्दिष्टे, गृहीते, संशोधन पध्दती याचा अभ्यास प्रस्तुत प्रकरणात करण्यात येईल.

प्रकरण २ रे:- साहीत्य संशोधनाचा आढावा

या प्रकरणामध्ये या विषयासंदर्भात आलेल्या संशोधनाचा, विविध लेखकांनी लिहीलेल्या लेख, माहीतीचा आढावा घेण्यात येईल.

प्रकरण ३ रे :- जालना जिल्ह्याची सामाजिक व आर्थिक स्थिती

या शोध प्रबंधामध्ये तीसरे प्रकरण हे जालना जिल्हाची सामाजिक व आर्थिक स्थिती हे घेण्यात आले असून या प्रकरणात जालना जिल्हाची भौगोलिक आणि प्रशासकीय दृष्टिकोणातून अभ्यास करण्यात येणार आहे. त्याचबरोबर जालना जिल्हातील शेती व हवामान, पीकपध्दती, शेतीपुरक व्यवसाय याचा सविस्तर आढावा येथे घेण्यात येणार आहे.

प्रकरण ४ थे:- शेतीपुरक व्यवसायाचे स्वरुप

प्रस्तुत प्रकरणामध्ये शेतीपुरक व्यवसायांचा सविस्तर आढावा घेण्यात येणार असून या अंतर्गत १) दुग्धव्यवसाय, २) कुक्कुटपालन, ३) शेळी व मेंढी पालन, ४) मत्स पालन, ५) फुलशेती, ६) फळशेती, ७) भाजीपाला शेती, ८) वन शेती यांचा आढावा प्रस्तुत प्रकरणात घेण्यात येणार आहे.

प्रकरण ५ :- शेतक-यांची शेतीपुरक व्यवसायामुळे आर्थिक स्थितीचा अभ्यास

प्रस्तुत प्रकरणामध्ये जालना जिल्हातील ज्या शेतक-यांकडून प्रश्नावली भरून घेण्यात आली आहे. त्या प्रश्नावलिचे सविस्तर विश्लेषन इथे करण्यात येईल.

प्रकरण ६ :- निष्कर्ष आणि शिफारशी

प्रस्तुत प्रकरणामध्ये संपूर्ण संशोधन अहवालाचा निरिक्षात्मक व चिकित्सक अभ्यास करुन निष्कर्ष काढण्यात येणार आहेत व त्याच बरोबर या निष्कर्षावरून संशोधकाला ज्या शिफारशी करणे योग्य वाटतील ते परिपूर्ण करण्याचा प्रयत्न या प्रकरणात करणार आहे.

संदर्भ सूची:-

१) कृषी अर्थशास्त्र- साहित्य भवन पब्लिकेशन्स डॉ. जय प्रकाश मिश्र

२) शेतकरी मासीक शेती विभाग महाराष्ट्र शासन

३) All India report input survey २०११-१२

४) योजना मासीक जुन २०१६

भारत सरकार कृषी विभाग Website

६) महराष्ट्र शासन कृषी विभाग Website

७) भारतीय अर्थशास्त्र- मिश्र एवं पुरी, दत्तसुंदरम

संशोधन मार्गदर्शक

प्रा.डॉ.किसन बाबुळगांवकर

संशोधक

श्री.नवल समाधान ज्ञानेश्वर